CNR No. MHGA-03-000002/2018

<u>सं.फौ.मा.क्र. १/२०१८</u>
सरकार -वि- धनराज

# <u>आदेश नि.क्र.४ खाली</u>

(दि.१७.०३.२०१८ रोजी पारीत)

आरोपी आज हजर झाला. आरोपीने नि.क्र.४ दोषारोपामधील उल्लेखीत आरोप त्याला मान्य असल्याचे कबुल केले. आरोपीने नि.क्र. ५ प्रमाणे त्याचेवर लावण्यात आलेला गुन्हा मंजुर असल्याबाबत पुरसीस सादर केलेला आहे. आरोपीचा हा पहीलाच गुन्हा असल्यामुळे कमीत कमी शिक्षा देण्याची विंनती केली. आरोपीला सदर गन्हा कबुल करणे बंधनकारक नाही. तसेच गुन्हा कबुल केल्यास शिक्षा होण्याबाबत मी प्रत्यक्षपणे सांगीतले. आरोपीस गुन्हा कबुलीचा परिणाम सांगीतल्यानंतर देखील गुन्हा कबुलीच्या निर्णयावर आरोपी ठाम आहे. यावरुन आरोपीने कोणत्याही दबावात न येता गुन्हा कबूल केल्याचे दिसून येते. गुन्हयाचे स्वरूप लक्षात घेता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) आरोपी नामे धनराज टुबाजी बांबोळे, राह. कन्नमवार वार्ड, पोस्ट ऑफिसच्या मागे गडचिरोली, ता.जि. गडचिरोली, याला मोटार वाहन कायदयाचे कलम १८५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरीता रूपये २,०००/- (एकुण अक्षरी दोन हजार रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येते.

२) दंड न भरल्यास सात दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

स्वा/-
( एन. सी. बोरफळकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
गडचिरोली.

स्थळ:-गडचिरोली.
दि. १७.०३.२०१८